# महाराष्ट्र विधानसभा

**दिवसाच्या कामकाजाचा क्रम**

**गुरुवार, दिनांक २५ जून, २०२६**

**(सकाळी ११-०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**मुख्यमंत्री** : महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**चार : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

(१) **सर्वश्री. सुधीर मुनगंटीवार, देवराव भोंगळे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"चंद्रपूर शहरातील औष्णिक वीज केंद्रे, कोळसा खाणी व इतर औद्योगिक प्रकल्पांमधून उत्सर्जित होणारा धूर, राख व कोळशाची धूळ यामुळे वायू प्रदूषणात मोठी वाढ होणे, परिणामी नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याची बाब निदर्शनास येणे, चंद्रपूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अहवालानुसार दिनांक १ जानेवारी, २०२३ ते ३१ मे, २०२६ या कालावधीत तीव्र श्वसन संसर्ग, दमा, ब्राँकायटिस, फुफ्फुसाचा कर्करोग व इतर श्वसनविकारांमुळे ३१ हजार ७३ रुग्ण उपचारासाठी दाखल होणे तसेच ३२५ नागरिकांचा मृत्यू होणे, चालू वर्षातील पहिल्या पाच महिन्यांतच ३४ मृत्यूंची नोंद होणे, लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांवर प्रदूषणाचा सर्वाधिक परिणाम होणे, तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व संबंधित यंत्रणांकडून प्रभावी उपाययोजना होत नसल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण होणे, शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, या पार्श्वभूमीवर चंद्रपूर शहरातील वायू प्रदूषण नियंत्रणासाठी, उद्योगांचे पर्यावरणीय लेखापरीक्षण करण्यासाठी, आरोग्य सर्वेक्षण राबविण्यासाठी व नागरिकांना शुद्ध हवा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **श्री. अबु आझमी, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"भिवंडी शहर आणि ग्रामीण परिसरात असलेल्या अनेक डाईंग आणि सायझिंग कंपन्यांकडून रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणावर कचरा, प्लास्टिक आणि कापडाच्या चिंध्या जाळल्या जात असणे, ज्यामुळे परिसरात हवेचे गंभीर प्रदूषण होत असल्याची

बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, अनेक डाईंग आणि सायझिंग उद्योगांकडे सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी 'ई.टी.पी.' (Effluent Treatment Plant) प्लांटची व्यवस्था नसणे, या उद्योगांकडून उक्त रासायनिक व दूषित पाणी थेट रस्ते तसेच सार्वजनिक गटारात सोडत असल्याचे निदर्शनास येणे, कंपन्यांच्या चिमण्यांची उंची १०० फुटांपेक्षा कमी असल्याने त्यातून निघणारा विषारी धूर थेट रहिवासी भागात पसरत असणे, त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झालेला असणे, अनेक कंपन्या रहिवासी क्षेत्रात नियमबाह्य पद्धतीने कार्यान्वित असणे, या प्रदूषणकारी उद्योगांवर तसेच पर्यावरणाचे नियम डावलणाऱ्या संबंधित उद्योजकांवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाकडून करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**(३) श्री.बापूसाहेब पठारे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात अलीकडे अनेक महिलांची प्रसूती नऊ महिने पूर्ण होण्यापूर्वीच होत असल्याने अकाली जन्मलेल्या नवजात बालकांना दीर्घकाळ एनआयसीयू (NICU) मध्ये उपचारासाठी ठेवावे लागणे, अशा उपचारांचा खर्च अनेकदा रुपये १५ लाख ते २५ लाख किंवा त्याहून अधिक होत असून, तो सर्वसामान्य व आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांच्या आवाक्याबाहेर असणे, वैद्यकीय खर्च भागविण्यासाठी अनेकांना स्थावर-जंगम मालमत्ता विकावी लागणे किंवा कर्जबाजारी व्हावे लागणे, खाजगी रुग्णालयांतील एनआयसीयू उपचारांच्या शुल्कावर प्रभावी नियंत्रण नसल्याने अवाजवी बिल आकारले जात असल्याच्या तक्रारी वाढत असणे, अनेकदा संपूर्ण बिल भरल्याशिवाय रुग्णाला डिस्चार्जही दिला जात नसणे, त्यामुळे संबंधित कुटुंबांवर मोठे आर्थिक व मानसिक संकट ओढवणे, यास्तव शासनाने प्री-मॅच्युअर नवजात बालकांच्या उपचारांसाठी माफक दर निश्चित करण्यासह संबंधित उपचारांचा शासकीय आरोग्य योजनांमध्ये समावेश करणे आवश्यक असणे, अवाजवी बिल आकारणाऱ्या रुग्णालयांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, बाधित कुटुंबांना तातडीचा आर्थिक दिलासा देण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**पाच : अल्पकालीन चर्चा (म.वि.स. नियम १०१ अन्वये) :-**

**(बुधवार, दिनांक २४ जून, २०२६ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली म.वि.स. नियम १०१ अन्वये अल्पकालीन चर्चेची सूचना)**

**सर्वश्री. सुधीर मुनगंटीवार, प्रविण दटके, मोहन मते, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील :-**

"राज्यात यंदाच्या उन्हाळ्यात अनेक जिल्ह्यांमध्ये तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून भूगर्भातील पाण्याची पातळी लक्षणीयरीत्या खालावल्याने नागरिकांसमोर पिण्याच्या पाण्याचे गंभीर संकट निर्माण होणे, अनेक गावांतील विहिरी, कूपनलिका, तलाव व लघु जलसाठे कोरडे पडल्याने नागरिकांना पाण्यासाठी मोठ्या प्रमाणात भटकंती करावी लागत असणे,

विशेषतः ग्रामीण भागातील महिलांना व नागरिकांना दररोज अनेक किलोमीटर अंतरावरून पाणी आणण्याची वेळ आल्यामुळे त्यांच्या दैनंदिन जीवनावर विपरीत परिणाम होणे, राज्यातील अनेक गावांमध्ये टँकरव्दारे पाणीपुरवठा करण्यात येत असला तरी तो अपुरा पडत असल्यामुळे अनेक ठिकाणी पाणीपुरवठ्याबाबत तक्रारी प्राप्त होणे, केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांतर्गत उभारण्यात आलेल्या नळ पाणीपुरवठा योजना अनेक ठिकाणी बंद अवस्थेत असल्यामुळे त्यांची कार्यक्षमता अत्यंत कमी असणे, परिणामी नागरिकांना सुरक्षित व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध होत नसणे, याशिवाय धरणांमधील पाणीसाठा झपाट्याने कमी होत असून अनेक भागांमध्ये दूषित पाण्याचा वापर करावा लागत असणे, विदर्भातील अनेक तालुक्यांमध्ये क्लोराईडयुक्त व क्षारयुक्त पाण्याची समस्या कायम असून त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येणे, दूषित पाण्यामुळे जलजन्य आजारांचा धोका वाढत असून ग्रामीण व दुर्गम भागातील परिस्थिती अधिक गंभीर असणे, पावसाच्या पाण्याचे संधारण, भूजल पुनर्भरण, जलस्त्रोतांचे पुनरुज्जीवन, नळ पाणीपुरवठा योजनांची दुरुस्ती व सक्षमीकरण, दूषित पाणी समस्येचे निराकरण, टँकर व्यवस्थेतील त्रुटी दूर करणे, जलव्यवस्थापनासाठी दीर्घकालीन धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**सहा : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८ - महाराष्ट्र नगरपालिका कायदे (सुधारणा) विधेयक, २०२६

---

**(ब) विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

(१) **(क)** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०२६ चा अध्यादेश क्रमांक ७ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) अध्यादेश, २०२६ नापसंत करते."

**(ख) सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०२६**

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, नाना पटोले, विकास ठाकरे, श्रीमती ज्योती गायकवाड, डॉ.विश्वजित कदम, सर्वश्री.साजिद पठाण, हेमंत ओगले, रामदास मसराम, अमित झनक व डॉ.नितीन राऊत, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भास्कर जाधव, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२)** **(क)** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०२६ चा अध्यादेश क्रमांक ८ - महाराष्ट्र रोजगार हमी (सुधारणा) अध्यादेश, २०२६ नापसंत करते."

(ख) **सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३७ - महाराष्ट्र रोजगार हमी (सुधारणा) विधेयक, २०२६**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३७ - महाराष्ट्र रोजगार हमी (सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, नाना पटोले, विकास ठाकरे, श्रीमती ज्योती गायकवाड, डॉ.विश्वजित कदम, सर्वश्री.साजिद पठाण, हेमंत ओगले, रामदास मसराम, अमित झनक व डॉ.नितीन राऊत, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३७ - महाराष्ट्र रोजगार हमी (सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भास्कर जाधव, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३७ - महाराष्ट्र रोजगार हमी (सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(क) विधानपरिषदेने संमत केल्याप्रमाणे विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(क)** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०२६ चा अध्यादेश क्रमांक ६ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०२६ नापसंत करते."

**(ख) सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १० - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२६**

सात : **सर्वश्री आदित्य ठाकरे, विजय वडेट्टीवार, जयंत पाटील, भास्कर जाधव, नाना पटोले, डॉ.जितेंद्र आव्हाड, श्री. सुनिल प्रभू, डॉ.नितिन राऊत, सर्वश्री रोहित पवार, दिलीप सोपल, अमिन पटेल, संदिप क्षीरसागर, अजय चौधरी, अस्लम शेख, बापूसाहेब पठारे, डॉ. राहूल पाटील, सर्वश्री अमित देशमुख, रोहित पाटील, कैलास घाडगे-पाटील, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री उत्तमराव जानकर, सुनील राऊत, अमित झनक, नारायण पाटील, संजय पोतनीस, शिरीषकुमार नाईक, अभिजीत पाटील, नितीन देशमुख, संजय मेश्राम, राजू खरे, वरुण सरदेसाई, श्रीमती ज्योती गायकवाड, सर्वश्री अनंत (बाळा) नर, हेमंत ओगले, हारुन खान, विकास ठाकरे, महेश सावंत, साजिद खान पठाण, मनोज जामसुतकर, रामदास मसराम, अनिल मांगुळकर, गजानन लवटे, सिध्दार्थ खरात, संजय देरकर, बाबाजी काळे, प्रविण स्वामी, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

"महाराष्ट्र शासनाने गृहनिर्माण धोरण जाहिर करणे, तथापि सदर गृहनिर्माण धोरणाची अद्याप पर्यंत पूर्णपणे अंमलबजावणी न होणे, राज्य शासन, एमएमआरडीए, पोलीस, शासनाची महामंडळे इत्यादींच्या कर्मचाऱ्यांसाठी मुंबई शहरातील वांद्रे, वरळी, घाटकोपर, मालाड, गोरेगाव व मरोळ इत्यादी ठिकाणी शासकीय वसाहती असणे, सदर वसाहती अत्यंत

जीर्ण झालेल्या असणे, त्यांची योग्य प्रकारे दुरुस्ती व देखभाल होत नसणे, सदर वसाहतींमध्ये राहणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची घरे मालकी हक्काने देण्याची होत असलेली मागणी, मुंबई शहरातील अरुंद रस्ते विकसित करताना येथील झोपड्या निष्कासित करुन २ किलोमीटरच्या परिसरात पर्यायी घरे देण्याची होत असलेली मागणी, यासाठी एसआरए, म्हाडा व महापालिकेकडून प्रकल्पग्रस्तांना घरे देण्यासाठी त्याच परिसरात इमारतींची निर्मिती करणे आवश्यक असणे, प्रकल्पबाधित रस्त्यामधील घरे २०११ च्या सशुल्क धोरणानुसार देवनार येथे पर्यायी घरे देण्याबाबत महापालिकेने घेतलेला निर्णय, या निर्णयास नागरीकांचा असलेला विरोध, इमारतींच्या विकास कामांसाठी होत असलेली बेसुमार वृक्षतोड, वृक्षतोडीमुळे होणारा पर्यावरणाचा ऱ्हास, मुंबईतील फुटपाथवरील वाढते अतिक्रमण, ठाणे महानगरपालिकेअंतर्गत सुमारे २,८००/- कोटी रुपयांचा उघडकीस आलेला टीडीआर घोटाळा, ठाणे शहरातील कोठारी कंपाऊंडमध्ये झालेले मोठ्या प्रमाणावरील अनधिकृत बांधकाम, मिरा भाईंदर महापालिकेतील गैरव्यवहार व कांदळवनांवर (मँग्रोव्ह) मातीचा भराव टाकून पाण्याची योजना मंजूर करणे, सन २००० मध्ये कळस गावाचा पुणे महानगरपालिकेत समावेश होऊनही स.नं. १२६ मधील स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्याची जागा मनपाने ताब्यात घेतलेली नसणे व जागा मालकांना मोबदलाही दिलेला नसणे, परिणामी अंत्यविधीसाठी जाणाऱ्या नागरिकांना रस्ता वापरण्यासाठी जागा मालकांशी करार करून पैसे द्यावे लागणे, ही अत्यंत गंभीर व नागरिकांच्या मूलभूत हक्कांशी संबंधित बाब असणे, तसेच पुणे विकास आराखड्यातील विश्रांतवाडी चौक ते धानोरी मुख्य रस्ता गेली तीस वर्षे होऊनही अरुंद असल्याने प्रचंड वाहतूक कोंडीचा सामना करावा लागणे, राज्यातील सर्वच महानगरपालिकांमध्ये विविध विकासकामे, पायाभूत सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, कचरा व्यवस्थापन व सार्वजनिक सेवा यांमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत असणे, कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च होऊनही अनेक शहरांतील रस्त्यांची दुरवस्था, अपुरी स्वच्छता व्यवस्था, पाणीपुरवठ्यातील अनियमितता, वाहतूक कोंडी आणि नागरिकांना भेडसावणाऱ्या मूलभूत समस्यांमध्ये अपेक्षित सुधारणा झालेली दिसून न येणे, शहरातील वाढत्या प्रदुषणामुळे नागरिकांच्या आरोग्याचा निर्माण झालेला प्रश्न, यामुळे सार्वजनिक निधीचा अपव्यय होऊन नागरिकांच्या कररूपाने जमा झालेल्या पैशांचा योग्य वापर होत नसल्याची भावना जनतेमध्ये निर्माण होणे, राज्यातील महानगरपालिकांमधील मागील काही वर्षांतील विकासकामांची स्वतंत्र चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही."

**आठ : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(मंगळवार, दिनांक २४ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली अर्धा तास चर्चेची सूचना) (क्रमांक १)**

**(१) श्री.शंकर जगताप, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"पिंपरी-चिंचवड शहराची वाढती गरज लक्षात घेता मुळशी धरणातून ७६० एमएलडी पाणी मिळावे अशी मागणी महानगरपालिकेने दिनांक २ डिसेंबर २०२३

मध्ये शासनाकडे करणे, शहरातील प्रत्येक व्यक्तीस प्रतिदिन १३५ लिटर पाण्याची गरज भासणे, सध्या पवना धरणातून ५१० एमएलडी आणि एमआयडीसी कडून ३० एमएलडी आणि आंध्रा धरणातून ७० एमएलडी एवढे असा दररोज ६१० एमएलडी पाणी दिवसा उद्योग नगरीत नागरिकांना पुरविण्यात येणे, शहराची लोकसंख्या आगामी १० वर्षात दुप्पटीने वाढणार असणे, पिंपरी-चिंचवड महापालिकेमध्ये हिंजवडी, माण, मारुंजी, जांभे, नेरे, सांगवडे, गहुंजे या सात गावांचा समावेश झाल्यास शहराला पुरेसे पाणी मिळावे यासाठी पाण्याचे नियोजन करण्याची आवश्यकता, चिंचवड शहराच्या पिण्याच्या पाण्याचे ऑडिट करणे, सांडपाण्याचा पुनर्वापर आणि पाण्याचे स्त्रोत याबाबत कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडून एकत्रित अहवाल तयार करण्यात येणे, मुळशी धरणातून बाहेर जाणाऱ्या पाण्याच्या मोजमापासाठी मीटर बसविण्याची आवश्यकता, मुळशी धरणातील पाणी आरक्षित केल्यास तसेच धरणाची उंची वाढविल्यास पुणे शहरासह पिंपरी-चिंचवड व पीएमआरडीए विभागातील रहिवाश्यांचा पाणी प्रश्न सुटण्यास मोठ्या प्रमाणात मदत होणार असणे, नवीन पाणीपुरवठा योजनेअंतर्गत भामा आसखेड धरणातून १३७ एमएलडी पाणी उचलणे व शेतजमीन पाण्याखाली जाऊन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत पाटबंधारे विभागाकडून सविस्तर अहवाल तयार करून उद्योगनगरीला पाणीपुरवठा देण्याबाबत सकारात्मक उपाययोजना करण्याची आवश्यकता, मुळशी धरणातून महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार जलसंपदा विभागाव्दारे २१५ एमएलडी पाण्याची मागणी व आरक्षणाची मागणी असणे, मुळशी धरणातील टाटा पॉवर मालकीच्या तीनशे मेगावॅट क्षमतेचा हायड्रोपॉवर जनरेशन करार हा सन २०३१ मध्ये संपत असून त्यानुसार पिंपरी-चिंचवड, पुणे व पीएमआरडीए हद्दीत वाढणारी लोकसंख्या लक्षात घेता आगामी ३० वर्षाचे नियोजन करण्यासाठी कमीत कमी १० टीएमसी पाणी उपलब्ध होण्याची व्यवहर्यता तपासण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(मंगळवार, दिनांक २३ जून २०२६ रोजीच्या बॅलटव्दारे ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेल्या अर्धा तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक २ व ३)**

**(२) श्री.हारुन खान, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबईतील मानखुर्द येथे चिल्ड्रन्स एड सोसायटीच्या ताब्यात असलेल्या सुमारे ५५ एकर शासकीय जमिनीवरील कथित अतिक्रमण, व्यावसायिक गैरवापर आणि प्रशासकीय निष्काळजीपणाचे प्रकरण माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान उघडकीस येणे, अनाथ, निराधार आणि विशेष काळजीची गरज असलेल्या मुलांच्या पुनर्वसनासाठी राखीव असलेल्या या जागेवर गेल्या अनेक वर्षांत मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर गोदामे, कमर्शियल शेड्स आणि व्यावसायिक बांधकामे उभारण्यात येणे, सार्वजनिक व कल्याणकारी उद्देशासाठी राखीव असताना कोणतीही वैधानिक परवानगी न घेता व्यावसायिक वापर केल्याने शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या

मालमत्तेचा होत असलेला गैरवापर, मुलांच्या सुरक्षेसाठी उभारण्यात आलेली संरक्षक भिंत तोडून निवासी इमारतींसमोर अनधिकृत बांधकामे उभारण्यात आल्याने बालकांच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण होणे, शासनाने या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित दोषींवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) श्री.राजेश पवार, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"नांदेड शहरात वारंवार विद्युत पुरवठा खंडित होणे, याबाबत महावितरणकडून तांत्रिक कारण दिले जात असून यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यास महावितरण अपयशी ठरणे, पावसाळा किंवा वाऱ्याच्या वेळी वीजपुरवठा खंडित होऊ नये यासाठी लाईन मेंटेनन्स व इन्फ्रास्ट्रक्चर मजबूत करण्यासाठी निधीची असलेली आवश्यकता, नांदेड शहरासाठी सर्व विभागांचा समन्वय साधून (महानगरपालिका, वाहतूक पोलीस, महावितरण) संयुक्त कृती आराखडा तयार करण्याची आवश्यकता, शहरातील नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी डिजिटल/ ऑनलाइन प्रणाली कार्यरत करुन त्या तक्रारींचे निवारणही वेळेत करण्याची आवश्यकता, शहराच्या वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर मूलभूत नागरी सुविधांच्या उभारणीसाठी शासनाने दीर्घकालीन योजना (Long term Master Plan) तयार करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(४) श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"चंद्रपूर जिल्ह्यातील मोरवा विमानतळ हे विदर्भाच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे पायाभूत साधन असूनही अनेक वर्षांपासून अपेक्षित विकासापासून वंचित असणे, चंद्रपूर शहरापासून अवघ्या ९ कि.मी. अंतरावर असलेले हे विमानतळ भौगोलिकदृष्ट्या अत्यंत अनुकूल असून ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्र, कोळसा व ऊर्जा प्रकल्प तसेच वाढत्या व्यापारी गरजांसाठी हे विमानतळ अत्यंत उपयुक्त ठरू शकते, मोरवा विमानतळावर नुकताच फ्लाईंग क्लब सुरू करण्यात आलेला असून स्थानिक युवकांना वैमानिक प्रशिक्षणाची मोठी संधी उपलब्ध होणे, तथापि, विमानतळावरील धावपट्टीची मर्यादित लांबी, आधुनिक टर्मिनल सुविधांचा अभाव, सुरक्षा व्यवस्थेतील अपुरेपणा व नियमित विमानसेवा नसल्यामुळे या विमानतळाचा अपेक्षित वापर होत नसणे, प्रशिक्षणार्थी विमानांच्या उड्डाणासाठी धावपट्टी दुरुस्तीसाठी ५ कोटी ६३ लाख रुपये तसेच संरक्षक भिंतीसाठी ११ कोटी ९३ लाख रुपये मंजूर करण्यात आले असले तरी विमानतळाचा सर्वंकष विकास करण्यासाठी अधिक व्यापक नियोजनाची आवश्यकता, सदर विमानतळाचा 'उडान' योजनेत समावेश करून मुंबई, पुणे, नागपूर, हैदराबाद व दिल्ली यांसारख्या प्रमुख शहरांशी थेट जोडणी निर्माण झाल्यास चंद्रपूर जिल्ह्याच्या औद्योगिक, पर्यटन, व्यापार व गुंतवणूक क्षेत्राला मोठी चालना मिळेल, विशेषतः ताडोबा पर्यटनासाठी देश-विदेशातून

येणाऱ्या पर्यटकांच्या सोयीसाठी नियमित विमानसेवा सुरू करण्याची आवश्यकता, तसेच चंद्रपूरसारख्या औद्योगिक जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी हवाई संपर्क ही काळाची गरज बनली असणे, शासनाकडून या विषयाकडे अपेक्षित गांभीर्याने लक्ष दिले जात नसल्याची भावना स्थानिक नागरिकांमध्ये निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

| | |
|---|---|
| **विधान भवन :** | **जितेंद्र भोळे,** |
| मुंबई, | सचिव-१, |
| दिनांक : २४ जून, २०२६. | महाराष्ट्र विधानसभा. |